# महाराष्ट्र कृषि सेवा (पूर्व) परीक्षा-२०१६
## घोषणा
## जाहिरात क्रमांक (१३/२०१६)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १० जुलै,२०१६ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषि सेवा, (पूर्व) परीक्षा-२०१६ चा निकाल दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल,**

३. मुख्य परीक्षेची अधिसूचना व मुख्य परीक्षेचा दिनांक लवकरच जाहीर करण्यात येईल.

४. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह असल्याने उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या अर्जात तेच दावे करावेत.

विजया पडते
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.मुंबई

ठिकाण:- मुंबई
दिनांक:- ०४ ऑक्टोबर, २०१६